रेलवे भर्ती बोर्ड / RAILWAY RECRUITMENT BOARDS
सीईएन - 04/2026 - जेई, डीएमएस, सीएमए - CEN - 04/2026 - JE, DMS, CMA

Test Date	28/10/2026
Test Time	9:00 AM - 10:30 AM
Subject / Exam Group	RRB JE DMS CMA CBT I

*** Note**
Correct Answer will carry 1 mark per Question.
Incorrect Answer will carry 1/3 Negative mark per Question.

1. Options shown in green color with a tick icon are correct.
2. Chosen option on the right of the question indicates the option selected by the candidate.

Section : **RRB JE DMS CMA CBT I**

Q.1 C, D, E, F, X, Y आणि Z यापैकी प्रत्येकाची परीक्षा सोमवारपासून सुरू होऊन आणि त्याच आठवड्याच्या रविवारी समाप्त होणाऱ्या आठवड्याच्या वेगळ्या दिवशी आहे.
Y ची परीक्षा गुरुवारी आहे आणि F ची परीक्षा शनिवारी आहे. C ची परीक्षा Z च्या लगतच आधी आहे. E ची परीक्षा X च्या नंतरच्या एका दिवशी आहे. D ची परीक्षा Z च्या लगतच नंतर आहे.
तर E आणि D यांच्या दरम्यान किती व्यक्तींची परीक्षा आहे?

Ans
✗ 1. एक
✗ 2. चार
✗ 3. दोन
✓ 4. तीन

Q.2 खालीलपैकी कोणत्या मध्यपूर्व देशाने भारतासोबत, जुलै 2026 मध्ये अंमलात आलेल्या, सीमापार गुंतवणुकीसाठी एक सुरक्षित आणि आधुनिक कायदेशीर चौकट निर्माण करणे हा उद्देश असलेला उभयपक्षी गुंतवणूक करार केला आहे?

Ans
✓ 1. स्टेट ऑफ इस्रायल
✗ 2. युनायटेड अरब एमिरेट्स
✗ 3. किंगडम ऑफ सौदी अरेबिया
✗ 4. स्टेट ऑफ कतार

Q.3 या प्रश्नात, (I) आणि (II) क्रमांकित अशी दोन विधाने दिली आहेत. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधानांत दिलेली माहिती पुरेशी आहे की नाही हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि योग्य उत्तर निवडा.
प्रश्न:
विहान, वामिका, झँडर, यशिका आणि झोरावर या पाच धावपटूंनी एक शर्यत पूर्ण केली. तर सर्वात शेवटी शर्यत कोणी पूर्ण केली?

विधाने:
(I) झँडर आणि झोरावर यांच्यामध्ये नेमके दोन धावपटू आहेत.
(II) वामिकाने विहानच्या आधी शर्यत पूर्ण केली आणि यशिकाने झँडरच्या आधी शर्यत पूर्ण केली.

Ans
✗ 1. केवळ विधान II मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर केवळ विधान I मधील माहिती पुरेशी नाही.
✗ 2. विधान I आणि II मधील माहिती एकत्रितपणे (केवळ विधान I किंवा केवळ विधान II नाही) प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे.
✓ 3. विधान I आणि II मधील माहिती एकत्रितपणे प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी नाही.
✗ 4. केवळ विधान I मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर केवळ विधान II मधील माहिती पुरेशी नाही.

Q.4 द ग्रेट इंडियन डेझर्ट अरवली पर्वतरांगेच्या कोणत्या सीमेवर स्थित आहे?

Ans
- ✔ 1. पश्चिमेकडील सीमा
- ✘ 2. उत्तरेकडील सीमा
- ✘ 3. दक्षिणेकडील सीमा
- ✘ 4. पूर्वेकडील सीमा

Q.5 6, 10, 14, 18, 22 या सामग्रीचे प्रचरण σ^2 असेल, तर σ^2 चे मूल्य किती असेल?

Ans
- ✘ 1. 28
- ✔ 2. 32
- ✘ 3. 30
- ✘ 4. 36

Q.6 खालील अक्षरे आणि चिन्हांच्या मालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या. मोजणी केवळ डावीकडून उजवीकडेच करायची आहे.
(डावी बाजू) L C * F A J / ^ Z O B O T M Q ? @ F C % T (उजवी बाजू)
दिलेल्या मालिकेत अशी किती चिन्हे आहेत, की ज्यांच्या प्रत्येकाच्या लगत आधी एक चिन्ह आणि लगत नंतर एक अक्षर येते?

Ans
- ✘ 1. एक
- ✘ 2. चार
- ✘ 3. तीन
- ✔ 4. दोन

Q.7 जर चांदीचा चमचा काही महिन्यांच्या वापरानंतर काळा पडला असेल, तर खालीलपैकी कोणती रासायनिक अभिक्रिया घडली असल्याची दाट शक्यता आहे?

Ans
- ✘ 1. चांदीची कार्बन डायऑक्साईडबरोबर अभिक्रिया होऊन सिल्वर कार्बोनेट तयार झाले आहे
- ✘ 2. चांदीची आर्द्रतेबरोबर अभिक्रिया होऊन सिल्वर हायड्रॉक्साइड तयार झाले आहे
- ✔ 3. चांदीची हवेतील सल्फरसोबत अभिक्रिया होऊन सिल्वर सल्फाईड तयार झाले
- ✘ 4. चांदीची ऑक्सिजनबरोबर अभिक्रिया होऊन सिल्वर ऑक्साईड तयार झाले आहे

Q.8 संयुगाच्या रेणुवस्तुमानाच्या गणनेचे सर्वात चांगले वर्णन कोणते विधान करते?

Ans
- ✘ 1. ते रेणूमधील सर्वात मोठ्या अणूवस्तुमानातून सर्वात लहान अणूवस्तुमान वजा करून काढले जाते.
- ✘ 2. ते रेणूमधील केवळ अद्वितीय अणूंच्या वस्तुमानांची मोजणी करून काढले जाते.
- ✘ 3. ते रेणूमधील अणूंपैकी सर्वोच्च अणूवस्तुमान वापरून काढले जाते.
- ✔ 4. ते रेणूमध्ये उपस्थित असलेल्या सर्व अणूंच्या अणूवस्तुमानांची बेरीज करून काढले जाते.

Q.9 भिन्न अणुअंक असलेल्या परंतु समान अणुवस्तुमानांक असलेल्या वेगवेगळ्या मूलद्रव्यांच्या अणूंना काय म्हणतात?

Ans
- ✘ 1. समघटके (isomers)
- ✔ 2. समभारिके (isobars)
- ✘ 3. समस्थानिके (isotopes)
- ✘ 4. समन्यूट्रॉन्स (isotones)

Q.10 या प्रश्नात, खाली दिलेल्या संकेतांनुसार आणि त्यानंतर दिलेल्या अटींनुसार संख्या/चिन्हांच्या समुहाला अक्षर संकेतांचा वापर करून संकेतबद्ध केले जाते. अटींचे पालन करणारा संकेतांचा योग्य क्रम हेच तुमचे उत्तर असेल. जर कोणत्याही अटी लागू होत नसतील, तर तक्त्यात दिल्याप्रमाणे संबंधित संख्या/ चिन्हासाठीच्या संकेतांचा थेट वापर करावा.

संख्या/चिन्ह 6 8 1 9 7 3 # @ 5 %

संकेत L R G M W X K Q E N

अटी–

i. जर पहिला घटक विषम संख्या असेल, तर पहिल्या आणि शेवटच्या घटकांच्या संकेतांची अदलाबदल करावी.

iii. जर दुसरा आणि तिसरा हे दोन्ही घटक संख्या असतील, तर तिसरा घटक हा दुसऱ्या घटकाच्या संकेताप्रमाणे संकेतबद्ध करावा.

ii. जर चौथा घटक सम संख्या असेल, तर चौथे आणि पाचवे घटक © म्हणून संकेतबद्ध करावेत.

खालील संख्या आणि चिन्हांच्या गटासाठी कोणता संकेत असेल?

68197

Ans

✗ 1. LRGMW

✗ 2. LXGMW

✓ 3. LRRMW

✗ 4. LRGKW

Q.11 एशियन U20 ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप 2026 मध्ये पूजा सिंगने 1.93 m अंतर पार करून 14 वर्षांपूर्वीचा राष्ट्रीय विक्रम मोडला. तिने ही कामगिरी कोणत्या प्रकारात केली?

Ans

✗ 1. महिलांचे पोल वॉल्ट

✓ 2. महिलांची उंच उडी

✗ 3. महिलांची लांब उडी

✗ 4. महिलांचे ट्रिपल जंप

Q.12 वक्ररेखी शिखर हे वैशिष्ट्य असलेली हिंदू मंदिर वास्तुकलेची नागर शैली प्रामुख्याने भारताच्या कोणत्या प्रदेशाशी संबंधित आहे?

Ans

✗ 1. ईशान्य भारत

✗ 2. केवळ मध्य दख्खन

✗ 3. दक्षिण भारत

✓ 4. उत्तर भारत

Q.13 दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय आले पाहिजे?

9 17 30 60 95 147 ?

Ans

✗ 1. 205

✓ 2. 204

✗ 3. 212

✗ 4. 209

Q.14 23 हे एका विशिष्ट तर्कानुसार 276 शी संबंधित आहे. त्याच तर्कानुसार, 20 हे 240 शी संबंधित आहे. त्याच तर्कानुसार, खालीलपैकी कशाशी 28 संबंधित आहे?

(टीपः संख्यांचे त्यांच्या घटक अंकांमध्ये विभाजन न करता संपूर्ण संख्यांवर क्रिया केल्या पाहिजेत. उदा. 13 - 13 वर क्रिया केल्या जाऊ शकतात जसे की 13 शी बेरीज / 13 तून वजाबाकी /13 शी गुणाकार. 13 ला 1 आणि 3 मध्ये विभाजित करणे आणि नंतर 1 आणि 3 वर गणिती क्रिया करणे यास परवानगी नाही.)

Ans

✗ 1. 348

✗ 2. 356

✗ 3. 372

✓ 4. 336

Q.15 बाह्यस्पर्शी असणाऱ्या दोन वर्तुळांच्या क्षेत्रफळांची बेरीज 130π sq.cm आहे. जर त्यांच्या केंद्रांमधील अंतर 14 cm असेल, तर लहान वर्तुळाची त्रिज्या किती असेल?

Ans
✗ 1. 5 cm
✓ 2. 3 cm
✗ 3. 11 cm
✗ 4. 9 cm

Q.16 जर '+' आणि '-' यांची परस्पर अदलाबदल केल्यास आणि 'x' व '÷' यांची परस्पर अदलाबदल केल्यास, दिलेल्या समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

45 ÷ 5 - 290 x 5 + 31 =?

Ans
✗ 1. 270
✗ 2. 264
✓ 3. 252
✗ 4. 260

Q.17 एका विशिष्ट सांकेतिक भाषेत,
'A @ B' चा अर्थ 'A हा B चा भाऊ आहे',
'A ^ B' चा अर्थ 'A हे B चे वडील आहेत',
'A ≠ B' चा अर्थ 'A हा B चा मुलगा आहे' आणि
'A ≥ B' चा अर्थ 'A ही B ची पत्नी आहे'.
वरील माहितीनुसार,जर 'P ≥ Q ≠ V ^ W @ X' असेल, तर P चे X शी काय नाते आहे?

Ans
✗ 1. मुलगी
✓ 2. भावाची पत्नी
✗ 3. बहीण
✗ 4. बहिणीची मुलगी

Q.18 I हा Z चा भाऊ आहे. C ही A ची बहीण आहे. Y हा A चा मुलगा आहे. A ही Z ची पत्नी आहे. तर I चे Y शी काय नाते असेल?

Ans
✓ 1. वडिलांचा भाऊ
✗ 2. वडिलांचे वडील
✗ 3. वडील
✗ 4. मुलगा

Q.19 खालील शब्दांवर आधारित हा प्रश्न आहे.
(डावी बाजू) SOB DIG FIN JOG (उजवी बाजू)
इंग्रजी वर्णक्रमानुसार उजवीकडून दुसऱ्या शब्दाचे दुसरे अक्षर आणि डावीकडून दुसऱ्या शब्दाचे तिसरे अक्षर यांच्यादरम्यान किती अक्षरे असतील?

Ans
✗ 1. 0
✓ 2. 1
✗ 3. 2
✗ 4. 4

Q.20 खालील समीकरण प्रणाली सोडवा, आणि x, y व z ची मूल्ये शोधा.

x + y + z = 12
x − 3y − z = 18
x − y − z = 10

Ans
✗ 1. x= 11, y = −4, z = 6
✗ 2. x= 10, y = −4, z = 5
✗ 3. x= 11, y = 4, z = 5
✓ 4. x= 11, y = −4, z = 5

Q.21 अणूच्या n व्या ऊर्जा पातळीमध्ये सामावू शकणाऱ्या इलेक्ट्रॉनची कमाल संख्या कोणत्या अभिव्यक्तीद्वारे (expression) दर्शवली जाते, जिथे n हा कवच क्रमांक आहे?

Ans

✔ 1. $2n^2$

✘ 2. 2n

✘ 3. n^2

✘ 4. n

Q.22 **A portable camping lantern operates with a built-in battery delivering a constant voltage. When a user switches from the 'dim' to the 'bright' setting, the lantern's bulb receives more power. Assuming the battery voltage remains unchanged, which change in the lantern's circuitry most directly explains the increased brightness?**

Ans

✘ 1. The voltage supplied by the battery is increased, keeping resistance constant

✘ 2. The resistance in the bulb circuit is increased, reducing current

✘ 3. The current through the bulb is decreased, with resistance unchanged

✔ 4. The resistance in the bulb circuit is decreased, increasing current

Q.23 P आणि Q या दोन मित्रांनी अनुक्रमे ₹386 आणि ₹178 च्या सुरुवातीच्या भांडवलासह एक व्यवसाय सुरू केला. वर्षाच्या शेवटी, व्यवसायाने ₹56,400 चा नफा कमावला. तर नफ्यामधील P चा वाटा (₹ मध्ये) काढा.

Ans

✔ 1. 38,600

✘ 2. 38,700

✘ 3. 38,500

✘ 4. 38,450

Q.24 ग्रामीण गरीबांना रोजगार देण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP) आणि ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम (RLEGP) एकत्रित करून भारतात जवाहर रोजगार योजना कधी सुरू करण्यात आली?

Ans

✘ 1. 1969

✘ 2. 1979

✘ 3. 1999

✔ 4. 1989

Q.25 प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या उद्देशाने 1991 मध्ये भारतीय रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले होते?

Ans

✔ 1. आंतरराष्ट्रीय ताळेबंदाच्या संकटाचे निराकरण करणे आणि परकीय चलनाचा अंतर्वेशी प्रवाह वाढवणे

✘ 2. देशांतर्गत बँकांकडून घेतल्या जाणाऱ्या सरकारी कर्जावर मर्यादा घालून त्यांची कार्यक्षमता वाढवणे

✘ 3. आयात केल्या जाणाऱ्या वस्तू तुलनेने स्वस्त करून परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे

✘ 4. अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी करून देशातील महागाई नियंत्रित करणे

Q.26 इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चारपैकी तीन अक्षर समूह जोड्यांमध्ये एका विशिष्ट प्रकारे साधर्म्य आहे आणि म्हणून त्या एक गट तयार करतात. तर ह्या गटात न बसणारी अक्षर समूह जोडी कोणती असेल?
(सूचना: गटात न बसणारा अक्षर समूह जोडी ही त्यातील व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर समूहातील त्यांच्या स्थानावर आधारीत नसावी.)

Ans

✘ 1. FI-MD

✘ 2. JM-QH

✘ 3. HK-OF

✔ 4. LO-SI

Q.27 खालील अक्षरे आणि चिन्हांच्या मालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या. मोजणी केवळ डावीकडून उजवीकडे करायची आहे.
(डावी बाजू) U % & T # £ C £ W N Q @ V T € G # * T $ U # (उजवी बाजू)
यात अशी किती अक्षरे आहेत की ज्यांच्या लगत आधी एक अक्षर आणि लगत नंतर एक चिन्हदेखील आहे?

Ans

✘ 1. 3

✔ 2. 2

✘ 3. 4

✘ 4. 5

black book

Q.28 एका बिजागरीवर (hinge) बसवलेल्या रॉडच्या मोकळ्या टोकावर बल प्रयुक्त केल्यामुळे तो रॉड त्या बिजागरीभोवती फिरू लागतो. प्रयुक्त बलाद्वारे केलेल्या कार्याबद्दल काय सांगता येईल?

Ans
- ✔ 1. केलेले कार्य धन आहे कारण बलप्रयुक्ती बिंदू (point of application of the force) विस्थापित झाला आहे.
- ✘ 2. केलेले कार्य केवळ रॉडच्या वस्तुमानावर अवलंबून असते.
- ✘ 3. बिजागरी स्थिर राहिल्याने केलेले कार्य शून्य आहे.
- ✘ 4. रॉड फिरत असल्यामुळे केलेले कार्य ऋण आहे.

Q.29 ₹10,000 ही रक्कम 8% वार्षिक दराने अर्धवार्षिक चक्रवाढ व्याज आकारणीनुसार 6 महिन्यांसाठी उसणे म्हणून दिली जाते. तर 6 महिन्यांच्या शेवटी मिळणारे चक्रवाढ व्याज आणि सरळव्याज यांमधील फरक किती असेल?

Ans
- ✘ 1. ₹2
- ✘ 2. ₹20
- ✔ 3. ₹0
- ✘ 4. ₹4

Q.30 दिलेल्या मालिकेतील प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय यायला हवे?

41 52 64 77 91 106 ?

Ans
- ✘ 1. 118
- ✘ 2. 125
- ✘ 3. 120
- ✔ 4. 122

Q.31 एका दोरीला चेंडू बांधून तो स्थिर वेगाने आडव्या वर्तुळाकार मार्गावर फिरवला जात आहे. जर ती दोरी अचानक तुटली, तर काय होईल?

Ans
- ✘ 1. चेंडू वर्तुळाच्या केंद्रापासून बाहेरच्या दिशेने जाईल.
- ✔ 2. चेंडू तुटण्याच्या बिंदूपाशी वर्तुळाला स्पर्शरिषीय असणाऱ्या दिशेने सरळ रेषेत जाईल.
- ✘ 3. चेंडू थोड्या काळासाठी वर्तुळाकार मार्गावर फिरत राहील.
- ✘ 4. चेंडू वर्तुळाच्या केंद्राकडे आतल्या बाजूने सर्पिलाकार फिरेल.

Q.32 **An open rectangular box (without a lid) is made of wood 1 cm thick. Its external dimensions are 20 cm long, 15 cm wide, and 10 cm high. Find the volume of the wood used in making the box.**

Ans
- ✘ 1. 800 cm^3
- ✔ 2. 894 cm^3
- ✘ 3. 900 cm^3
- ✘ 4. 856 cm^3

Q.33 ज्ञात असलेला सर्वात कठीण नैसर्गिक पदार्थ कोणता आहे, जो कार्बनचे एक अपरूप आहे?

Ans
- ✘ 1. अस्फटिकी कार्बन
- ✔ 2. हिरा
- ✘ 3. कोळसा
- ✘ 4. ग्रॅफाइट

Q.34 पृथ्वीवर ग्रहीय वाऱ्यांच्या आकृतीबंधांच्या निर्मितीचे मुख्य कारण काय आहे?

Ans
- ✘ 1. पर्वतरांगांचे स्थलरूप
- ✔ 2. वेगवेगळ्या अक्षांशांवर होणारे असमान सौर उष्णतेचे वितरण
- ✘ 3. विशाल महासागरांचे अस्तित्व
- ✘ 4. चंद्र व सूर्याचे गुरुत्वाकर्षण

black

Q.35 जेव्हा एका विजेच्या खांबाच्या सावलीची लांबी ही त्या खांबाच्या उंचीइतकीच असते, तेव्हा सूर्याचा उन्नत कोन शोधा.

Ans

✔ 1. 45°

✘ 2. 30°

✘ 3. 90°

✘ 4. 60°

Q.36 जमिनीत पुरलेला एक लांब, उभा धातूचा पाईप वरच्या दिशेने स्थिर विद्युत प्रवाह वाहून नेतो. एक तंत्रज्ञ जमिनीवर या पाईपाला समांतर 0.8 मीटर अंतरावर एक डिजिटल होकायंत्र धरतो. अनपेक्षितपणे, होकायंत्राची सुई उत्तरेकडे संरेखित होण्याऐवजी पूर्वेकडे वळते. खालीलपैकी कोणते विश्लेषण या निरीक्षणाचे सर्वात अचूक स्पष्टीकरण देते?

Ans

✘ 1. होकायंत्रास जमिनीच्या वर अशा प्रकारे प्रभावित करण्यासाठी विद्युतधारा स्थिर नसून प्रत्यावर्ती असणे आवश्यक असते.

✘ 2. होकायंत्राची सुई पाईपपासून थेट बाहेरच्या दिशेने दर्शवली पाहिजे, कारण विद्युतधारा वाहून नेणाऱ्या तारांमधून चुंबकीय क्षेत्र सरळ रेषेत उत्सर्जित होते.

✔ 3. वरच्या दिशेने वाहणाऱ्या विद्युतधारेमुळे निर्माण होणारे चुंबकीय क्षेत्र आडवे वाहते; ज्यामुळे होकायंत्राची सुई त्या ठिकाणी पाईपाच्या चुंबकीय क्षेत्राला स्पर्शरिषीय संरेखित होते.

✘ 4. होकायंत्र केवळ पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रामुळेच प्रभावित होते, त्यामुळे पाईपामधील विद्युतधारेमुळे होकायंत्रात झालेले विक्षेपण स्पष्ट करता येत नाही.

Q.37 $[(98 \div 14) \times \{(76 \div 4) + (12 \div 6) \times (7 - 4)\}]$ ची किंमत काढा.

Ans

✘ 1. 73

✔ 2. 175

✘ 3. 693

✘ 4. 707

Q.38 एक विद्यार्थी एकाच बाकावर पेन्सिलने दोनदा मारतो — पहिल्यांदा हळूवारपणे आणि नंतर जास्त जोराने. खालीलपैकी कोणते निरीक्षण बरोबर आहे?

Ans


✔ 1. जोराने मारल्याने मोठा ध्वनी निर्माण होतो कारण त्यामुळे जास्त आयामाची कंपने निर्माण होतात

✘ 2. हळूवार मारल्याने मोठा ध्वनी निर्माण होतो कारण तो जास्त वेळ टिकतो

✘ 3. ध्वनीची तीव्रता केवळ बाकाच्या जाडीवर अवलंबून असते

✘ 4. दोन्ही वेळेस सारखीच तीव्रता असलेला ध्वनी निर्माण होतो कारण तीच पेन्सिल वापरली आहे

Q.39 दिलेल्या आकृतीत, PQ ∥ RS आहे. तर Y ची किंमत काढा.



Ans

✔ 1. 63

✘ 2. 27

✘ 3. 93

✘ 4. 117

Q.40 एक वस्तू तिच्या खरेदी किमतीवर 131% नफ्याने विकली जाते. जर खरेदी किंमत आणि विक्री किंमत यांची अदलाबदल केली, तर या व्यवहारात किती टक्के तोटा होईल? तुमचे उत्तर दोन दशांश स्थानांपर्यंत मर्यादित करा.

Ans
- ✗ 1. 58.16%
- ✗ 2. 57.15%
- ✗ 3. 59.28%
- ✓ 4. 56.71%

Q.41 एका विशिष्ट तर्कानुसार 168 हे 19 शी संबंधित आहे. त्याचप्रकारे, 144 हे 16 शी संबंधित आहे, तर त्या तर्कानुसार खालीलपैकी काय 128 शी संबंधित असेल?
(सूचना : क्रिया संपूर्ण संख्येवर कराव्यात, तिच्यातील अंकांमध्ये त्या संख्येची विभागणी करू नये. उदाहरणार्थ, 13 – येथे 13 वर बेरीज/वजाबाकी/गुणाकार इ. क्रिया करणे अभिप्रेत आहे, मात्र 13 ची विभागणी 1 आणि 3 अशी करून 1 आणि 3 यांवर गणितीय क्रिया करणे अभिप्रेत नाही.)

Ans
- ✗ 1. 19
- ✗ 2. 16
- ✗ 3. 21
- ✓ 4. 14

Q.42 मूल्यांकन करा.

$$\left(\frac{18}{18} \div \frac{18}{9}\right) \div \left(\frac{2}{10} \times \frac{20}{6} + \frac{2}{6}\right) + \frac{9}{11} \div \frac{18}{14} \text{ of } \frac{14}{11}$$

Ans
- ✗ 1. 2
- ✓ 2. 1
- ✗ 3. 4
- ✗ 4. 9

Q.43 एक पेटता (चालू) विजेचा बल्ब आणि एक इलेक्ट्रिक हीटर दोन वेगवेगळ्या बंद पेट्यांमध्ये ठेवलेले आहेत. काही वेळाने, दोन्ही पेट्या गरम होतात. शेवटी दोन्ही पेट्यांमधून सभोवतालच्या वातावरणात ऊर्जेचे कोणते स्वरूप हस्तांतरित होते?

Ans
- ✓ 1. औष्णिक (उष्णता) ऊर्जा
- ✗ 2. विद्युत ऊर्जा
- ✗ 3. प्रकाश ऊर्जा
- ✗ 4. रासायनिक ऊर्जा

Q.44 जानेवारी 2026 मध्ये, IIT बॉम्बे येथे PARAM Rudra या सुपरकॉम्प्युटरचे उद्घाटन करण्यात आले. ही सुविधा कोणत्या मोहिमेअंतर्गत विकसित आणि तैनात करण्यात आली होती?

Ans
- ✗ 1. इंडिया सेमीकंडक्टर मिशन (India Semiconductor Mission)
- ✗ 2. नॅशनल क्वांटम मिशन (National Quantum Mission)
- ✓ 3. नॅशनल सुपरकॉम्प्युटिंग मिशन (National Supercomputing Mission)
- ✗ 4. नॅशनल ब्लॉकचेन फ्रेमवर्क (National Blockchain Framework)

Q.45 कोणती अभिक्रिया अधातूचा ऑक्सिजनबरोबरचा संयोग दर्शवते?

Ans
- ✗ 1. $CaCO_3 \rightarrow CaO + CO_2$
- ✗ 2. $2Na + Cl_2 \rightarrow 2NaCl$
- ✗ 3. $CH_4 + 2O_2 \rightarrow CO_2 + 2H_2O$
- ✓ 4. $C + O_2 \rightarrow CO_2$

Q.46 भारतातील गावाच्या अधिकारिता क्षेत्रातील सार्वजनिक जागांवरून अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी खालीलपैकी कोणते प्राधिकरण जबाबदार असते?

Ans
- ✓ 1. ग्रामपंचायत
- ✗ 2. तालुका दंडाधिकारी
- ✗ 3. पोलिस विभाग
- ✗ 4. ग्राम न्यायालये

black book

Q.47 1828 मध्ये राजा राममोहन रॉय यांनी कोणत्या सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीची स्थापना केली होती?

Ans
✗ 1. अध्यात्मिकतेला प्रोत्साहन देणारी थिओसॉफिकल सोसायटी
✗ 2. वैदिक सुधारणांना प्रोत्साहन देणारा आर्य समाज
✓ 3. एकेश्वरवादाला प्रोत्साहन देणारा ब्राह्मो समाज
✗ 4. भक्तीला प्रोत्साहन देणारा प्रार्थना समाज

Q.48 एका आयताच्या लांबी आणि रुंदीचे गुणोत्तर 3 : 2 आहे. जर लांबी 18 cm असेल, तर त्या आयताचे क्षेत्रफळ (cm^2 मध्ये) किती असेल?

Ans
✗ 1. 210
✓ 2. 216
✗ 3. 108
✗ 4. 144

Q.49 R, S, T, U, G, H आणि I ह्या व्यक्ती एका वर्तुळाकार टेबलाभोवती टेबलाच्या केंद्राकडे तोंड करून बसल्या आहेत.
H हा U च्या उजवीकडे चौथ्या स्थानी बसला आहे. I च्या डावीकडून मोजल्यास, I आणि S यांच्यामध्ये केवळ दोन व्यक्ती बसल्या आहेत. R हा T च्या डावीकडे तिसऱ्या स्थानी बसला आहे. G हा T आणि S चा लगतचा शेजारी आहे. तर G च्या डावीकडून मोजल्यास, H आणि G यांच्यामध्ये किती व्यक्ती बसलेल्या असतील?

Ans
✓ 1. चार
✗ 2. तीन
✗ 3. एक
✗ 4. दोन

Q.50 एका डायनिंग टेबल सेटची सूचीबद्ध किंमत ₹20,000 आहे. एक स्टोअर या किमतीवर 10% आणि 20% अशा सलग सवलती देते. तर दोन्ही सवलती लागू केल्यानंतर ग्राहकाला द्यावी लागणारी अंतिम किंमत काय असेल?

Ans
✗ 1. ₹12,000
✗ 2. ₹16,000
✗ 3. ₹15,000
✓ 4. ₹14,400

Q.51 बाह्य उद्दीपनांना त्वरित प्रतिसाद देण्यासाठी वनस्पतींमध्ये कोणत्या प्रकारच्या ऊतींचा अभाव असतो?

Ans
✗ 1. अपित्वचा ऊती
✓ 2. चेता ऊती
✗ 3. विभाजी ऊती
✗ 4. संवहनी ऊती

Q.52 इंग्रजी वर्णक्रमानुसार दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी खालीलपैकी कोणता पर्याय येईल?
LFI KEH JDG ICF ?

Ans
✗ 1. HCE
✗ 2. HCF
✓ 3. HBE
✗ 4. HBF

Q.53 जर $y - 9 = 3\sqrt{7}$ असल्यास, $\sqrt{(y-1)} - \frac{1}{\sqrt{y-1}}$ चे मूल्य काय असेल?

Ans
✗ 1. $2\sqrt{7}$
✓ 2. $\sqrt{14}$
✗ 3. $7\sqrt{2}$
✗ 4. 28

black

Q.54 एका वर्गातील विद्यार्थ्यांनी गणितात मिळवलेले सरासरी गुण 92 होते. मुलांना मिळालेले सरासरी गुण हे मुलींना मिळालेल्या सरासरी गुणांपेक्षा 20% ने जास्त आहेत. जर मुलांचे मुलींशी असणाऱ्या संख्याचे गुणोत्तर 5 : 2 असेल, तर मुलींना मिळालेल्या गुणांची सरासरी किती असेल?

Ans
- ✗ 1. 82
- ✗ 2. 77
- ✗ 3. 80.4
- ✓ 4. 80.5

Q.55 **Which process is responsible for causing muscle cramps during sudden physical activity due to a lack of oxygen?**

Ans
- ✗ 1. Aerobic respiration in muscles
- ✗ 2. Photosynthesis in muscles
- ✓ 3. Anaerobic respiration in muscles
- ✗ 4. Fermentation in yeast

Q.56 एक ठराविक रक्कम, सरळव्याजाने गुंतवली असता, ती 2 वर्षांत ₹1,750 आणि 4 वर्षांत ₹2,000 इतकी होते. तर वार्षिक व्याजाचा दर दोन दशांश स्थानांपर्यंत मर्यादित करून काढा.

Ans
- ✓ 1. 8.33%
- ✗ 2. 10.33%
- ✗ 3. 7.33%
- ✗ 4. 9.33%

Q.57 **In 1969, which taxonomist developed the five kingdom model to classify living organisms?**

Ans
- ✗ 1. Carl Linnaeus
- ✗ 2. Herbert F. Copeland
- ✗ 3. Aristotle
- ✓ 4. Robert H. Whittaker

Q.58 उत्तरेकडे तोंड करून 103 व्यक्ती एका रांगेत उभे आहेत. श्री. सोनू हे उजव्या टोकापासून 7 व्या स्थानावर आहेत तर श्री. पिक हे डाव्या टोकापासून 77 व्या स्थानावर आहेत. तर श्री. सोनू आणि श्री. पिक यांच्या दरम्यान किती व्यक्ती असतील?

Ans
- ✗ 1. 17
- ✗ 2. 12
- ✗ 3. 15
- ✓ 4. 19

Q.59 चेता ऊतींच्या संदर्भात, चेतापेशींचे मुख्य कार्य काय आहे?

Ans
- ✗ 1. चेतापेशी हालचालीसाठी बल निर्माण करतात.
- ✓ 2. चेतापेशी संदेश स्वीकारतात आणि प्रसारित करतात.
- ✗ 3. चेतापेशी शरीरासाठी संप्रेरके तयार करतात.
- ✗ 4. चेतापेशी मेंदूसाठी ऊर्जा साठवतात.

Q.60 खाली दिलेल्या दोन जोड्यांमध्ये ज्या प्रारूपाचे अनुसरण केले आहे, त्याच प्रारूपाचे अनुसरण करणारी जोडी पर्यायांमधून निवडा. दोन्ही जोड्या एकाच प्रारूपाचे अनुसरण करतात.

DTP : ARS
GPN : DNQ

Ans
- ✗ 1. NIR : KGT
- ✗ 2. FJU : CHW
- ✓ 3. EYQ : BWT
- ✗ 4. NQQ : KNR

black

Q.61 पुरुष प्रजनन संस्थेतील ग्रंथींच्या भूमिकेबाबत कोणते विधान बरोबर आहे?

Ans
✗ 1. ते शुक्रपेशींच्या निर्मितीसाठी कारणीभूत असतात.
✓ 2. ते शुक्राणूंना पोषण देणारे द्रव मिसळतात.
✗ 3. ते शुक्राणूंचे अनुवांशिक द्रव्य साठवतात.
✗ 4. ते वृषणांचे तापमान नियंत्रित करतात.

Q.62 **A man can row at 8 km/h in still water. The speed of the current is 3 km/h. To go upstream a certain distance, it takes 6 hours more than going than going the same distance downstream. Find the one way distance travelled.**

Ans
✗ 1. 45 km
✓ 2. 55 km
✗ 3. 60 km
✗ 4. 50 km

Q.63 जर उभ्या तारेमधील विद्युत प्रवाहाची दिशा वरच्या दिशेने असेल, तर (वरून पाहिल्यास) तिच्या सभोवतालच्या चुंबकीय क्षेत्र रेषांची दिशा _____ असेल.

Ans
✗ 1. घड्याळाच्या काट्याच्या दिशेने
✗ 2. नेहमी वरच्या दिशेने
✓ 3. घड्याळाच्या काट्यांच्या विरुद्ध दिशेने
✗ 4. नेहमी खालच्या दिशेने

Q.64 औद्योगिक स्तरावर साबण आणि अपमार्जके (detergents) यांच्या उत्पादनात सोडिअम हायड्रॉक्साइडचा मोठ्या प्रमाणावर वापर का केला जातो?

Ans
✗ 1. कारण ते साबणाच्या उत्पादनांचा कडकपणा वाढवते
✗ 2. कारण ते कपडे धुताना विरंजक म्हणून कार्य करते
✗ 3. कारण ते सभोवतालच्या हवेतील आर्द्रता शोषून घेते
✓ 4. कारण त्याची मेदाबरोबर रासायनिक अभिक्रिया होऊन साबण आणि ग्लिसरॉल तयार होते

Q.65 जानेवारी 2026 मध्ये, खालीलपैकी कोणत्या ठिकाणाहून भारताच्या पहिल्या खुल्या समुद्रातील सागरी मत्स्य शेती प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले?

Ans
✓ 1. अंदमान समुद्र
✗ 2. बंगालचा उपसागर
✗ 3. अरबी समुद्र
✗ 4. लक्षद्वीप समुद्र

Q.66 गोलिय भिंगांच्या कार्टेशियन चिन्ह संकेतानुसार, भिंगासमोर ठेवलेल्या वास्तविक वस्तूसाठी वस्तूच्या अंतराचे चिन्ह काय असेल?

Ans
✗ 1. वस्तूचे अंतर भिंगाच्या प्रकारावर अवलंबून असते.
✓ 2. वस्तूचे अंतर ऋण असते.
✗ 3. वस्तूचे अंतर शून्य असते.
✗ 4. वस्तूचे अंतर धन असते.

Q.67 **A, B, U, V, Y आणि Z या प्रत्येकाने वेगवेगळे गुण मिळवले. केवळ A ने B पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. Z आणि A यांच्या दरम्यान केवळ तीनच व्यक्तींनी गुण मिळवले आहेत. U ने Y पेक्षा कमी परंतु V पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. तर V आणि B यांच्या दरम्यान किती व्यक्तींनी गुण मिळवले आहेत?**

Ans
✗ 1. एक
✓ 2. तीन
✗ 3. दोन
✗ 4. चार

black

Q.68 खाली दिलेल्या दोन जोड्यांमध्ये ज्या प्रारूपाचे अनुसरण केले आहे, त्याच प्रारूपाचे अनुसरण करणारी जोडी पर्यायांमधून निवडा. दोन्ही जोड्या एकाच प्रारूपाचे अनुसरण करतात.

IQI : GSK
OMP : MOR

Ans
- ✗ 1. LKC : JMD
- ✗ 2. SMJ : QOK
- ✓ 3. DVR : BXT
- ✗ 4. GWS : EXU

Q.69 1605 मध्ये मसुलीपट्टणम (Masulipatnam) येथे आपली पहिली वखार स्थापन करणारी आणि नंतर भारतातील आपले मुख्यालय पुलिकत येथे बनवणारी युरोपीय सत्ता कोणती?

Ans
- ✗ 1. फ्रेंच
- ✓ 2. डच
- ✗ 3. पोर्तुगीज
- ✗ 4. इंग्रजी

Q.70 खालील पदावलीला सोडवा.

$$3200 \div 16 \text{ of } \frac{1}{80} + \frac{15}{320} \times 6400 + [850 \div 17] \times 40$$

Ans
- ✗ 1. 19300
- ✗ 2. 16300
- ✓ 3. 18300
- ✗ 4. 17300

Q.71 पाच जलीय द्रावणांचा सामू (pH) मूल्ये 1, 4, 7, 9 आणि 11 आहेत. खालीलपैकी कोणती मांडणी हायड्रोजन आयनच्या (H^+) संहतीचा वाढता क्रम अचूकरित्या दर्शवते?

Ans
- ✗ 1. 4 < 1 < 7 < 9 < 11
- ✗ 2. 7 < 9 < 11 < 4 < 1
- ✗ 3. 1 < 4 < 7 < 9 < 11
- ✓ 4. 11 < 9 < 7 < 4 < 1

Q.72 अक्षतने ₹39600 ची गुंतवणूक 10% वार्षिक चक्रवाढ व्याज दराने अर्धवार्षिक चक्रवाढ आकारणीनुसार 1 वर्षासाठी केली, तर त्याला मिळणारी रक्कम किती असेल?

Ans
- ✗ 1. ₹43063
- ✗ 2. ₹43488
- ✓ 3. ₹43659
- ✗ 4. ₹44618

Q.73 लसिका, ऊतींमधील अतिरिक्त द्रव अभिसरण संस्थेत परत कशा प्रकारे आणते, याचे अचूक स्पष्टीकरण देणारे विधान कोणते आहे?

Ans
- ✓ 1. लसिका, पेशीबाह्य जागेतील अतिरिक्त द्रव परत रक्तात वाहून नेते
- ✗ 2. लसिका, तांबड्या रक्तपेशी थेट उतींमधील मोकळ्या जागेत सोडते
- ✗ 3. लसिका, द्रव थेट हृदयाच्या कप्प्यांमध्ये पंप करते
- ✗ 4. सूज येणे टाळण्यासाठी, लसिका, ऊतींमधील सर्व प्लाझ्मा शोषून घेते

Q.74 जर खालील डेटाचा मध्य 50 असेल, तर x ची किंमत काय आहे?

वर्ग	30-40	40-50	50-60	60-70	70-80
वारंवारता	47	19	21	13	X

Ans
- ✗ 1. 37
- ✗ 2. 45
- ✓ 3. 20
- ✗ 4. 14

blackbook

Q.75 CYCLOTOMIES या शब्दातील प्रत्येक स्वर हा इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत आधीच्या अक्षराने बदलला जातो आणि प्रत्येक व्यंजन हे इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत नंतरच्या अक्षराने बदलले जाते. तर अशा प्रकारे तयार झालेल्या अक्षरांच्या गटात किती अक्षरे दोनपेक्षा जास्त वेळा येतील?

Ans
- ✗ 1. चार
- ✗ 2. एक
- ✗ 3. तीन
- ✓ 4. दोन

Q.76 एक जीवशास्त्रज्ञ एका नमुन्यावर सूर्यप्रकाश केंद्रित करण्यासाठी +5 D शक्तीच्या अभिसारी भिंगाचा वापर करतो. जर गरम झाल्यामुळे भिंगाचे नाभीय अंतर बदलून 15 cm झाले, तर भिंगाची नवीन शक्ती किती असेल?

Ans
- ✗ 1. +5 D
- ✗ 2. +1.5 D
- ✗ 3. +0.15 D
- ✓ 4. +6.67 D

Q.77 एका ठराविक अंतरापैकी एक-पंचमांश अंतर 85 km/h वेगाने, एक-तृतीयांश अंतर 60 km/h वेगाने आणि उर्वरित अंतर 80 km/h वेगाने पार केले गेले. तर संपूर्ण प्रवासादरम्यानचा सरासरी वेग (km/h मध्ये) किती असेल? (दोन दशांश स्थानांपर्यंत मर्यादित करा)

Ans
- ✗ 1. 75.25
- ✗ 2. 72.11
- ✗ 3. 70.51
- ✓ 4. 72.77

Q.78 पेट्रोलची किंमत (प्रति लिटर) 75% ने वाढते. पेट्रोलवरील एकूण खर्च केवळ 61% ने वाढावा यासाठी त्याच्या वापरामध्ये किती टक्के बदल करावा लागेल?

Ans
- ✗ 1. 18% ने वाढवावा लागेल
- ✓ 2. 8% ने कमी करावा लागेल
- ✗ 3. 18% ने कमी करावा लागेल
- ✗ 4. 8% ने वाढवावा लागेल

Q.79 $(\sin\theta + \operatorname{cosec}\theta)^2 + (\cos\theta + \sec\theta)^2 - \tan^2\theta - \cot^2\theta$ चे मूल्य काढा.

Ans
- ✗ 1. 10
- ✗ 2. 6
- ✗ 3. 0
- ✓ 4. 7

Q.80 चेतन A स्थानापासून गाडी चालवण्यास सुरुवात करतो आणि पश्चिमेकडे 27 km गाडी चालवतो. त्यानंतर तो डावीकडे वळतो आणि 16 km गाडी चालवतो. तो शेवटचे डावीकडे वळण घेतो आणि 32 km गाडी चालवून B या स्थानावर थांबतो. मोहन P या स्थानापासून गाडी चालवण्यास सुरुवात करतो, जो A या स्थानापासून 56 km पूर्वेकडे आहे, आणि पश्चिमेकडे 21 km गाडी चालवतो. त्यानंतर तो डावीकडे वळतो आणि 16 km गाडी चालवतो. शेवटी तो उजवीकडे वळतो, 24 km गाडी चालवतो आणि Q स्थानावर थांबतो. तर स्थान Q आणि स्थान B यांच्यातील सर्वात कमी अंतर किती असेल? (सर्व वळणे केवळ 90 अंशांची आहेत.)

Ans
- ✓ 1. 6 km
- ✗ 2. 4 km
- ✗ 3. 2 km
- ✗ 4. 8 km

Q.81 खालीलपैकी कोणते विधान हे स्पष्ट करते की, अर्धगुणसूत्री विभाजनामुळे (meiosis) निर्माण होणारी जनुकीय विविधता काही जीवांना जगण्यास कशी मदत करते?

Ans
- ✗ 1. सर्व प्राण्यांची वैशिष्ट्ये सारखीच असतात, त्यामुळे ते सर्व समान रीतीने जगतात.
- ✓ 2. सूत्री विभाजनातील बदलांमुळे नवीन परिस्थितीशी अधिक चांगल्या प्रकारे जुळवून घेणारी वैशिष्ट्ये प्राप्त होतात.
- ✗ 3. ज्या प्राण्यांमध्ये गुणसूत्रांची (chromosomes) संख्या जास्त असते, ते प्राणी नेहमीच परिस्थितीशी अधिक चांगल्या प्रकारे जुळवून घेतात.
- ✗ 4. जगणे हे केवळ मूळ जनुकीय संकेतावर (genetic code) अवलंबून असते, बदलांवर नाही.

Q.82 9 संख्यांची एकूण बेरीज 81 असेल, तर त्या संख्यांची सरासरी किती असेल?

Ans
✗ 1. 19
✗ 2. 10
✗ 3. 8
✓ 4. 9

Q.83 एका दंडगोलाकार घनाचे एकूण पृष्ठफळ 792 cm^2 आहे. जर त्याच्या तळाचा व्यास 12 cm असेल, तर त्या दंडगोलाकार घनाची उंची (cm मध्ये) किती असेल? ($\pi = \frac{22}{7}$)

Ans
✗ 1. 14
✓ 2. 15
✗ 3. 12
✗ 4. 13

Q.84 जर एका संख्येच्या 40% मध्ये 120 मिळवले, तर परिणाम तीच संख्या येते. तर त्याच संख्येचे 70% किती असतील?

Ans
✓ 1. 140
✗ 2. 120
✗ 3. 160
✗ 4. 180

Q.85 $ABCD$ हा समांतरभुज चौकोन आहे, $\angle A = (3x + 5)^\circ$ आणि $\angle C = (2x + 12)^\circ$ असेल तर $\angle B$ ची किंमत काढा.

Ans
✗ 1. 128°
✗ 2. 95°
✗ 3. 87°
✓ 4. 154°

Q.86 जर '+' व '-' यांची अदलाबदल केली आणि 'x' व '÷' यांची अदलाबदल केली, तर खालील समीकरणात '?' च्या जागी काय येईल?
25 ÷ 3 + 36 x 4 - 7 = ?

Ans
✓ 1. 73
✗ 2. 71
✗ 3. 72
✗ 4. 74

Q.87 भारतातील विस्तृत उत्तर मैदानांची निर्मिती प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या नदीप्रणालींच्या दीर्घकालीन निक्षेपण क्रियेमुळे झाली आहे?

Ans
✗ 1. साबरमती, लुणी आणि माही नदी प्रणाली
✗ 2. नर्मदा, तापी आणि महानदी नदी प्रणाली
✓ 3. सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रा नदी प्रणाली
✗ 4. गोदावरी, कृष्णा आणि कावेरी नदी प्रणाली

Q.88 खालीलपैकी कशामुळे भावंडांमध्ये अनुवांशिक विविधता निर्माण होते?

Ans
✓ 1. मायोसिस दरम्यान गुणसूत्रांची यादृच्छिक जुळणी
✗ 2. बाह्य पर्यावरणीय घटकांमुळे थेट होणारे बदल
✗ 3. मायटोसिसद्वारे पेशींचे एकसारखे विभाजन
✗ 4. त्रुटींशिवाय DNA ची अचूक प्रतिकृती तयार होणे

Black book

Q.89 ₹9100 चे तीन भाग अशा प्रकारे करा की पहिल्या भागाचा अर्धा, दुसऱ्या भागाचा एक चतुर्थांश आणि तिसऱ्या भागाचा एक अष्टमांश समान असतील. तर पहिला भाग (₹ मध्ये) काढा.

Ans
✗ 1. 1600
✗ 2. 1400
✓ 3. 1300
✗ 4. 1200

Q.90 परचक्र आणि अंतर्गत अशांततेपासून राज्यांचे संरक्षण करणे हे 'केंद्राचे कर्तव्य' असल्याचा उल्लेख कोणत्या अनुच्छेदात आहे?

Ans
✗ 1. अनुच्छेद 354
✗ 2. अनुच्छेद 365
✓ 3. अनुच्छेद 355
✗ 4. अनुच्छेद 360

Q.91 दिगबोई हे सर्वात जुने तेलक्षेत्र असणारा कोणता प्रदेश भारतातील सर्वात जुने कच्चे पेट्रोलियम उत्पादन क्षेत्र म्हणून ओळखला जातो?

Ans
✓ 1. आसाम
✗ 2. राजस्थान
✗ 3. तामिळनाडू
✗ 4. गुजरात

Q.92 विज्ञानात प्रामुख्याने वापरल्या जाणाऱ्या कार्बन अणूचे अणुवस्तुमान काय आहे?

Ans
✗ 1. 1 u
✗ 2. 14 u
✓ 3. 12 u
✗ 4. 16 u

Q.93 जलस्त्रोतामध्ये नायट्रेट्स आणि फॉस्फेट्स सारख्या पोषक तत्वांचा अतिरेक झाल्यामुळे शैवालांची अमर्याद वाढ होते आणि विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण घटते, या प्रक्रियेला_____असे म्हणतात.

Ans
✗ 1. जैवविवर्धन (Biomagnification)
✗ 2. वाळवंटीकरण (Desertification)
✗ 3. अम्लीभवन (Acidification)
✓ 4. सुपोषण (Eutrophication)

Q.94 एक उत्पादक आपली विक्री किंमत उत्पादन खर्चापेक्षा 26% ने जास्त निश्चित करतो. जर उत्पादन खर्च 26% ने वाढला आणि उत्पादकाने आपली विक्री किंमत 50% ने वाढवली, तर नफ्याची टक्केवारी काढा.

Ans
✓ 1. 50%
✗ 2. 51%
✗ 3. 47%
✗ 4. 53%

Q.95 PROVEN या शब्दातील प्रत्येक अक्षर हे इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत पुढील अक्षराने बदलले जाते आणि त्यानंतर तयार झालेल्या अक्षरांच्या समूहातील सर्व अक्षरे इंग्रजी वर्णक्रमानुसार मांडली जातात. अशा प्रकारे तयार झालेल्या नवीन अक्षरांच्या समूहात उजवीकडून दुसरे अक्षर कोणते असेल?

Ans
✗ 1. P
✗ 2. Q
✓ 3. S
✗ 4. O

black book

Q.96 एक पाईप टाकी 24 मिनिटांत भरू शकतो, तर दुसरा पाईप पूर्ण भरलेली टाकी 56 मिनिटांत रिकामी करू शकतो. जर रिकाम्या टाकीसाठी दोन्ही पाईप्स एकाच वेळी चालू केले, तर टाकीचा एक-तृतीयांश भाग भरण्यास किती वेळ (मिनिटांत) लागेल?

Ans
- ✗ 1. 12
- ✗ 2. 13
- ✗ 3. 15
- ✓ 4. 14

Q.97 तोंडातील पचनक्रियेमध्ये, स्नायुमय जीभ कसे योगदान देते?

Ans
- ✗ 1. अन्न थेट जठरामध्ये वाहून नेऊन
- ✗ 2. तोंडाच्या आतील अस्तराचे संरक्षण करण्यासाठी श्लेष्मा तयार करून
- ✗ 3. तोंडामध्ये पाचक विकर (enzymes) स्रवून
- ✓ 4. अन्न लाळेसोबत मिसळून आणि चावण्यास मदत करून

Q.98 या प्रश्नात, खाली दिलेल्या संकेतांनुसार आणि त्यानंतर दिलेल्या अटींनुसार संख्या/चिन्हांच्या समुहाला अक्षर संकेतांचा वापर करून संकेतबद्ध केले जाते. अटींचे पालन करणारा संकेतांचा योग्य क्रम हेच तुमचे उत्तर असेल. जर कोणत्याही अटी लागू होत नसतील, तर तक्त्यात दिल्याप्रमाणे संबंधित संख्या/ चिन्हासाठीच्या संकेतांचा थेट वापर करावा.

संख्या/चिन्ह * @ 6 3 9 1 2 ? 7 8

संकेत B H Z X C U D L R A

अटी–

i. जर पहिला घटक चिन्ह असेल, तर पहिल्या आणि शेवटच्या घटकांच्या संकेतांची अदलाबदल करावी.

iii. जर दुसरा आणि तिसरा हे दोन्ही घटक संख्या असतील, तर तिसरा घटक हा दुसऱ्या घटकाच्या संकेताप्रमाणे संकेतबद्ध करावा.

ii. जर चौथा घटक चिन्ह असेल, तर चौथे आणि पाचवे घटक © म्हणून संकेतबद्ध करावेत.

खालील संख्या-चिन्हांच्या गटासाठी सांकेतिक शब्द काय आहे?

***@639**

Ans
- ✓ 1. CHZXB
- ✗ 2. DHZXC
- ✗ 3. BHZLC
- ✗ 4. BHUXC

Q.99 जेव्हा एखादी वस्तू _____ तेव्हा ती एकसमान गतीत आहे असे म्हटले जाते.

Ans
- ✓ 1. समान कालावधीत समान अंतर पार करते
- ✗ 2. वारंवार वेग वाढवते आणि कमी करते
- ✗ 3. आपली दिशा सतत बदलते
- ✗ 4. समान कालावधीत असमान अंतर पार करते

Q.100 अणूंची संज्ञा लिहिण्याच्या नियमांवर आधारित, खालीलपैकी कोणती जोडी मूलद्रव्य आणि त्याच्या अणू संज्ञेशी अचूकपणे जुळते?

Ans
- ✗ 1. लोह-Ir
- ✗ 2. चांदी-Si
- ✗ 3. पोटॅशियम-Po
- ✓ 4. सोडियम-Na

"